लोकसत्ता पृ. पान क्र. १ दि. 11/04/2023

# महापालिकेच्या मालमत्ता कराच्या बोगस पावत्या

## पालिकेचे आर्थिक नुकसान, नागरिकांची फसवणूक

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार महापालिकेच्या नावाने बनावट कर पावत्या दिल्या जात असल्याचे धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. याप्रकरणी पालिकेने दिलेल्या तक्रारीनुसार नालासोपारा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसई-विरार महापालिकेतर्फे नागरिकांकडून मालमत्ता कर वसूल केला जातो. मालमत्ता कर हे उत्पन्नाचे एक प्रमुख साधन आहे. नागरिकांनी कर भरावा यासाठी पालिकेकडून विविध मोहिमा राबवून जनजागृती करण्यात येते. जे नागरिक कर भरत नाहीत त्यांच्यावर दंडाची आकारणी करून मालमत्ताजप्त करण्यात येतात. २०२२-२३ या आर्थिक वर्षात पालिकेने ३५० कोटींहून अधिक विक्रमी कर वसुली केली होती. आर्थिक वर्ष संपल्याने ज्या थकबाकीदारांनी मालमत्ता कराचा भरणा केला नाही **(पान ३ वर)**

### अधिकृत मार्गाने कर भरण्याचे आवाहन

महापालिकेने कर भरण्यासाठी नागरिकांना विविध आणि सोपे पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. पालिकेच्या मुख्यालयात तसेच सर्व प्रभागात कर भरता येतो. पालिकेच्या संकेतस्थळावरून तसेच विविध ऑनलाइन ॲपच्या माध्यमातून घरबसल्या कर भरता येतो. पालिका कर भरण्यासाठी परिसरात शिबिरे आयोजित करते. त्यामुळे कुठल्याही अनोळखी व्यक्तीकडे खातरजमा न करता कर भरणा करू नये, असे आवाहन पालिकेच्या मालमत्ता विभागाने केले आहे.

# मालमत्ता कराच्या बोगस पावत्या

*(पान १ वरून)* त्यांच्या मालमत्ता जप्त करण्यास सुरुवात करण्यात आली होती. नालासोपारा पश्चिमेच्या प्रभाग समिती ई अंतर्गत थकबाकीदारांच्या मालमत्ता सील करण्याची प्रक्रिया सुरू असताना हा धक्कादायक प्रकार सुरू आला. आम्ही मालमत्ता कराचा भरणा केला आहे, असे या नागरिकांनी सांगितले. त्यांनी मालमत्ता कर भरल्याच्या पावत्या सादर केल्या. त्या पाहून मोठा धक्का बसला. कारण त्या पावत्या हुबेहूब जरी असल्या तरी त्या बनावट होत्या.

याप्रकरणी प्रभाग समिती ई च्या प्रभारी साहाय्यक आयुक्त नीता कोरेगावकर यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तींच्या विरोधात ४२०, ४६५, ४६८, ४७१ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आतापर्यंत ४ जणांनी बोगस मालमत्ता कराच्या पावत्या सादर केल्या असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

आम्ही या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून तपास करत आहोत. नेमक्या कुणी या पावत्या दिल्या, या मागे कोण आहे, शहरात अन्य ठिकाणी अशा पावत्या देण्यात आल्या आहेत का त्याचा तपास सुरू असल्याची माहिती नालासोपारा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे यांनी दिली.

# १३ जागांसाठी ४० उमेदवार रिंगणात

## वसई कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी एकूण १३ जागांसाठी ४० उमेदवार रिंगणात आहे. या निवडणुकीपूर्वी ६ जागा बिनविरोध आल्या असून त्यात ५ जागा बहुजन तर एक जागा विरोधी पॅनलला मिळाली आहे.

येत्या २८ एप्रिल रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक होणार आहे. मागील वर्षी वसई कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक बिनविरोध झाली होती. त्यात विरोधकांना काही जागा दिल्या गेल्या असल्या तरी सत्ता मात्र बहुजन विकास आघाडीने आपल्याच हाती ठेवली होती. या वेळेला पहिल्यांदा भाजपच्या राजेंद्र म्हात्रे यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने बहुजन विकास आघाडीला आव्हान दिले आहे. त्यामुळे वसई कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीला रंगत येऊ लागली आहे. १३ जागांसाठी ४० उमेदवार रिंगणात राहिले आहेत. अर्ज मागे घेण्याची शेवटची तारिख २१ एप्रिल आहे. त्यामुळे यापैकी किती उमेदवार आपली उमेदवारी मागे घेतात हे २१ एप्रिलला समजणार आहे.

### सहा जागा बिनविरोध

कृषी उत्पन्न समितीच्या एकूण १९ जागांपैकी ६ जागा या बिनविरोध आल्या आहेत. यात ५ जागा बहुजन विकास आघाडीला मिळाल्या आहेत, तर एक जागा विरोधी पॅनलला मिळाली आहे. बिनविरोध आलेल्या जागामध्ये व्यापारी मतदारसंघातून बहुजन विकास आघाडीचे विमलकुमार अंबानी आणि सुनील सरवैया, भटक्या विमुक्तमधून आनंद वडे, दुरबल घटकांमधून संजय घरत आणि महिलांमध्ये भारती पाटील हे बहुजन विकास आघाडीचे उमेदवार बिनविरोध आले आहेत, तर श्वेता सचिन पाटील या विरोधी पॅनलमधून बिनविरोध आल्या आहेत.

CamScanner

लोकसत्ता पृ. पान क्र. 1 दि. 11/04/2023

# महामार्गावरील अपघातांत तीन महिन्यांत २० जणांचा मृत्यू

## महामार्गावर वाहनांची वाढती वर्दळ आणि अपघातांतही वाढ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** वसई पूर्वेच्या भागातून गेलेल्या मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर अपघातांत मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले आहे. तीन महिन्यांत महामार्गावर घडलेल्या अपघातात २० जणांचा मृत्यू झाला आहे.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर दिवसेंदिवस वाहनांची वर्दळ अधिक प्रमाणात वाढली आहे. त्यासोबत अपघात होण्याचे प्रमाणही वाढले आहे. विशेषतः मागील दोन वर्षांपासून महामार्गावर अपघाती मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक आहे. अतिवेगाने वाहने चालविणे, वाहनांवरील नियंत्रण सुटणे, बंद वाहनांना धडका लागणे, काही भागांत रस्त्याची झालेली लेन कटिंग, अपुरे दुभाजक, पथदिव्यांचा अभाव अशा विविध कारणांमुळे अपघात घडत आहेत.

२०२३ या वर्षाच्या सुरुवातीच्या दहिसर टोलनाका ते शिरसाड या दरम्यान तीन महिन्यांतच २० जणांचा अपघातात मृत्यू झाला आहे. तर १८ प्रवासी जखमी व पाच प्रवासी हे गंभीर जखमी झाले असल्याची माहिती महामार्ग पोलिसांनी दिली आहे. याआधीच्या वर्षात संपूर्ण वर्षभरात सरासरी १८ ते २० जणांचा अपघाती मृत्यू होण्याचे प्रमाण होते. मात्र हेच प्रमाण मागील वर्षांपासून वाढीस लागले आहे.


### अपघात आकडेवारी

| वर्ष | जखमी | मृत्यू |
|---|---|---|
| २०१९ | ७० | २० |
| २०२० | ९६ | १२ |
| २०२१ | ८६ | १५ |
| २०२२ | ५४ | ५९ |
| २०२३ | २३ | २० |

"महामार्गावर होणारे अपघात कमी करण्यासाठी रस्ते सुरक्षा अभियानातून विविध उपाययोजना आखल्या जात आहेत. वाहनचालकांनी ही नियमांचे पालन करून वाहने चालवावीत. -**विठ्ठल चिंतामण**, पोलीस उपनिरीक्षक, महामार्ग वाहतूक, चिंचोटी

### उपाययोजना अर्धवट

महामार्गावर होणारे अपघात रोखण्यासाठी प्राधिकरणाकडून वर्षभरापासून रमलर लावणे, रस्ते दुरुस्ती, सूचना फलक लावणे अशा उपाययोजना आखल्या जात आहेत. मात्र त्या सुद्धा उपाययोजना अपुऱ्याच आहेत. अजूनही बहुतांश उड्डाणपूल हे पथदिव्यांचा अभाव आहे. त्यामुळे रात्रीच्या सुमारास वाहनचालकांना अडचणी येतात तर दुसरीकडे जे सेवा रस्ते आहेत ते कचरा व राडारोडा याने भरलेले आहेत. त्यामुळे विश्रांतीसाठीची वाहने सुद्धा मुख्य रस्त्यावर उभी केली जात आहेत.



# उभ्या कंटेनरला मोटारीची धडक; चालक ठार

**लोकसत्ता वार्ताहर**

**बोईसर:** मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील हालोली ग्रामपंचायतीच्या पाडोस पाड्याच्या हद्दीत रस्त्यालगत उभ्या कंटेनरला भरधाव वेगातील कार धडकल्याने झालेल्या भीषण अपघातात कारचालकाचा जागीच मृत्यू झाला आहे. अमर बंधू मौर्य (४७) असे मयत कार चालकाचे नाव होते.

शनिवारी दुपारी दोन वाजताच्या सुमारास मारुती व्हॅनमधून किराणा माल घेऊन मुंबई -अहमदाबाद महामार्गावरून मनोरच्या दिशेने जात असताना हालोलीच्या पाडोस पाड्याच्या हद्दीत भरधाव वेगातील कारचालकाचे नियंत्रण सुटल्याने मारुती व्हॅन महामार्गालगत उभ्या असलेल्या कंटेनरला धडकली. या भीषण अपघातात कारचालकाचा जागीच मृत्यू झाला.

---

## उपप्रादेशिक परिवहन विभागाची कारवाई


# वसई, विरार शहरात वर्षभरात १२०० रिक्षांवर कारवाई

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** वसई, विरार शहरात नियमबाह्य पद्धतीने चालविल्या जाणाऱ्या रिक्षांवर उपप्रादेशिक परिवहन विभागाने कारवाई केली आहे. वर्षभरात एक हजार २६१ इतक्या रिक्षांवर कारवाई करण्यात आली आहे.

परवाने खुले झाल्यानंतर वसई विरारमध्ये रिक्षांच्या संख्येत वाढ झाली आहे. शहरात काही ठिकाणी अनधिकृत रिक्षा, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन, प्रवाशांची आर्थिक लूट, अतिरिक्त प्रवासी वाहतूक, कागदपत्रांविना रिक्षा चालविणे असे प्रकार सर्रासपणे घडत होते. अशा रिक्षाचालकांना आवर घालण्यासाठी वसई उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून विशेष तपासणी मोहीम हाती घेण्यात येत होती. या मोहिमेत जवळपास ४ हजार ९४५ रिक्षांची तपासणी केली यात १ हजार २६१ वाहने दोषी आढळून आली आहेत. यात अतिरिक्त भाडे ३८४, अतिरिक्त प्रवासी वाहतूक ५२१, प्रवाशांसोबत गैरवर्तन ८, इतर ३३७, परवाना निलंबन ६५, अनुज्ञप्ती निलंबन १४० अशा विविध प्रकारच्या कारवायांचा समावेश असून ३१ लाख ९८ हजार ८०० इतका दंड वसूल करण्यात आला आहे. रिक्षांवरील कारवाईची मोहीम प्रत्येक महिन्यात राबविली जाणार आहे, अशी माहिती उपप्रादेशिक परिवहन विभागाने दिली आहे.

दरम्यान, नियमांचे उल्लंघन करून रिक्षा शहरात फिरताना आढळून येत आहेत. त्यांच्यावर कारवाईसाठी अधूनमधून विशेष मोहीम राबविण्याचे नियोजन केले जात आहे, असे सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रवीण बागडे यांनी सांगितले.



### नवीन रिक्षांची नोंदणी वाढली

परवाने खुले झाल्यानंतर परवाने काढून नवीन रिक्षा घेण्याकडे नागरिकांचा कल वाढला आहे. २०२१-२२ या वर्षात परिवहन कार्यालयात १ हजार ५२५ इतक्या रिक्षांची नोंद झाली होती. तर यंदाच्या २०२२-२३ या वर्षात २ हजार ५८० इतक्या रिक्षांची नोंद करण्यात आली. मागील वर्षाच्या तुलनेत १ हजार ५५ ने नोंदणीमध्ये वाढ झाली आहे.

CamScanner

दि. ११/०४/२०२३

लोकसत्ता पृ. पान क्र.३

# वसईच्या सनसिटी दफनभूमीचे भवितव्य अधांतरी

## तांत्रिक मुद्द्यांबरोबरच वाढता विरोध

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसईच्या सनसिटी येथील सर्वधर्मीय दफनभूमीचे कामाच्या स्थगितीची मुदत संपल्यानंतरही काम सुरू झालेले नाही. या कामाविरोधात हरित लवादाकडे दाखल याचिकेवरील सुनावणी लांबणीवर पडल्याने कामही लांबणीवर पडले आहे. तांत्रिक मुद्द्यांवरून विरोध होत असताना सामाजिक विरोध वाढला असल्याने या सर्वधर्मीय दफनभूमीच्या कामावरच आता प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

शहरातील मुस्लीम आणि ख्रिस्ती प्रोटेस्टंट धर्मीयांच्या मागणीनुसार वसई पश्चिमेच्या सनसिटी येथे (दिवाणमान भूमापन क्रमांक १७६ आणि १७७) येथे वसई-विरार महापालिकेने सर्वधर्मीय दफनभूमीचे काम सुरू केले होते. ही जागा पाणथळ क्षेत्रात असून त्याला स्थानिक संघटनांनी विरोध केला आहे. या दफनभूमीच्या विरोधात पर्यावरणवादी कार्यकर्ते सुनील मुळ्ये यांनी हरित लवादाकडे आव्हान दिले होते. त्याची ३१ मार्च रोजी सुनावणी होती. त्यामुळे तांत्रिक कारणाच्या आधारे पालिकेने या कामाला ३१ मार्चपर्यंत स्थगिती दिली होती. मात्र एप्रिल महिना सुरू झाला तरी पालिकेने कामाला सुरुवात केलेली नाही. या याचिकेवरील पुढील सुनावणी १८ मे रोजी होणार आहे. तो पर्यंत पालिकेला काम करता येणार नाही.

**भवितव्य अधांतरी :** तांत्रिक गोष्टींवर विरोध होत असताना दुसरीकडे हा धार्मिक मुद्दा बनला आहे. सकल हिंदू समाजाच्या नावाखाली निघालेल्या हिंदुत्ववादी संघटनांनी देखील या दफनभूमीला विरोध केला आहे. काम लांबणीवर पडल्याने मुस्लीम समाज आक्रमक झाला आहे. काँग्रेसचे नेते समीर वर्तक यांनी काम सुरू करावे, या मागणीसाठी पालिका अधिकाऱ्यांची शुक्रवारी भेट घेतली. चालढकल करण्यामागे काम रद्द करण्याचा संशय वर्तक यांनी व्यक्त केला आहे.

'वनशक्ती' या पर्यावरणवादी संस्थेने पाणथळ क्षेत्राच्या संरक्षणाविषयी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर १४ ऑक्टोबर २०१३ रोजी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयात ही जागा पाणथळ असून त्यावर परवानगीशिवाय बांधकाम करता येणार नाही, असे आदेश दिले होते. कुठल्याही पाणथळ जागेत बांधकाम करायचे असल्यास उच्च न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे. मात्र, पालिकेने शासनाच्या पर्यावरण विभागाची परवानगी घेतली आहे. ती बेकायदा असून, आदेशाचा अवमान करणारी आहे. त्यामुळे हरित लवादाकडे दाद मागितली असल्याचे पर्यावरणवादी कार्यकर्ते सुनील मुळ्ये यांनी सांगितले. शहरात अन्य आरक्षित जागा असून त्याची यादी पालिकेला दिली आहे. पालिकेने तेथे दफनभूमी बनवावी, असेही मुळ्ये यांनी सांगितले.

# १२ व्या मजल्यावरून पडून कामगाराचा मृत्यू

**वसई :** बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या १२ व्या मजल्यावरील उदवहन (लिफ्ट)मधून पडून एका कामगाराचा मृत्यू झाला आहे. शनिवारी सकाळी नालासोपारा येथे ही दुर्घटना घडली.

नालासोपारा पूर्वेच्या मोरेगाव येथे स्मृती हाइट्स या इमारतीचे बांधकाम सुरू होते. सुशील मिश्रा या ठेकेदाराने हे काम हाती घेतले होते. सकाळी ९ च्या सुमारास काम सुरू असताना संजय गौड (३९) हा कामगार १२ व्या मजल्यावरून लिफ्टने खाली पडून त्याचा मृत्यू झाला.

# हत्येप्रकरणी फरार आरोपींना सहा वर्षांनी अटक

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मित्राची हत्या करून फरार झालेल्या दोन आरोपींना मध्यवर्ती गुन्हे शाखेने नालासोपारा येथून अटक केली आहे. मागील सहा वर्षांपासून ते पोलिसांना गुंगारा देत होते.

२०१८ मध्ये नालासोपाऱ्याच्या बिलालपाडा येथे राहणाऱ्या सुनील साहणी (३६) याची तिघांनी हत्या केली होती. याप्रकरणी पोलिसांनी दिवाकर सिंग याला अटक केली होती. मात्र, रमेशकुमार सिंग (४०) आणि सुधाकर सिंग (२०) हे फरार होते. या गुन्ह्याचा तपास मध्यवर्ती गुन्हे शाखेकडून सुरू होता. हे दोन्ही आरोपी उत्तर प्रदेशच्या गोंडा येथे ओळख बदलून राहत होते.

दरम्यान, हे दोन्ही आरोपी बिबालपाडा येथे आपल्या नातेवाइकांना भेटण्यासाठी येणार असल्याची माहिती साहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय सरक आणि पोलीस हवालदार राजाराम काळे यांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा लावून दोन्ही आरोपींना अटक केली. पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल राख, साहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय सरक यांच्या पथकाने ही कारवाई केली.

CamScanner

लोकसत्ता पृ.पान क्र.3

दि. 11/04/2023

# बोगस कॉल सेंटर चालवणारा मुख्य आरोपी फरार

## आरोपी पकडण्याचे पोलिसांपुढे आव्हान

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

गुन्हे वृत्त

**वसई :** राजोडी येथील एका फार्म हाऊसवर सुरू असलेले बेकायदेशीर कॉल सेंटर चालवणारा मुख्य आरोपी फरार असून त्याला पकडण्याचे मोठे आव्हान पोलिसांपुढे आहे. या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या ४९ आरोपींना १२ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

राजोडी समुद्रकिनाऱ्यावरील ओएली पेंट बॉल अरेना या फार्म हाऊसमध्ये गेल्या महिन्याभरापासून एक बेकायदेशीर कॉल सेंटर सुरू होते. राज्याच्या विविध भागांतील तरुणतरुणी या कॉल सेंटरमधून ऑस्ट्रेलियन बँक पे पाल ऑस्ट्रेलियाच्या ग्राहकांचे कॉल्स वळवून त्यांची आर्थिक फसवणूक करत होते. अर्नाळा सागरी पोलिसांनी या प्रकरणी ३६ तरुण, १० तरुणी तसेच २ रिसॉर्टचालक यांना अटक केली होती. त्यांना सोमवारी वसईच्या सत्र न्यायालयात हजर केले असता १२ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. त्यांच्याविरोधात फसवणूक, माहिती तंत्रज्ञान कायदा, भारतीय टेलिग्राम कायद्याच्या विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल केल्याची माहिती पोलीस उपायुक्त सुहास बावचे यांनी दिली.

**१८ हजार पगार आणि मुंबईचे आकर्षण**

या कॉल सेंटरमध्ये काम करणारे तरुणतरुणी दिल्ली, नोएडा, हरयाणा या भागांतील आहेत. त्यांचे शिक्षण फार नसले तरी इंग्रजीवर प्रभुत्व आहे. या कॉल सेंटरच्या म्होरक्याने त्यांना मुंबईत १८ हजारांची नोकरी आणि राहण्याची सोय असे आमिष दाखवले. त्यातील अनेक जण प्रथमच मुंबईत आले होते. आपण या रॅकेटचा भाग आहोत याची कल्पना त्यांना नव्हती. मुख्य आरोपीवर यापूर्वीदेखील गुन्हे दाखल असून तो फरार आहे. पोलीस निरीक्षक अमरसिंह पाटील (गुन्हे) वरिष्ठ पोलीस निरीक्षक कल्याणराव करपे आदींच्या पथकाने ही कारवाई केली.

पुण्यनगरी पृ.पान क्र.1

# अनधिकृत बांधकामविरोधात होणार आंदोलन

**। नालासोपारा :** नालासोपारा पश्चिमेकडील केसी कॉम्प्लेक्स गृहसंकुल सोसायटी आवारातील अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्या पूजा कांबळे यांनी नालासोपारा पोलीस व वसई-विरार महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्तांकडे केली आहे. पालिकेने जर कारवाई केली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्त्या कांबळे यांनी दिला आहे.

के सी कॉम्प्लेक्सच्या आवारामध्ये भाडोत्री गाळेधारकांनी सोसायटीचे सर्व नियम व अधिकार पायदळी तुडवून अनधिकृतपणे अंदाजे ५/६ फूट पुढे बांधकाम वाढवलेले आहे. सोसायटीच्या आवारामध्ये अत्यंत अस्वच्छता असून गटाराचे पाणी बाहेर येऊन दुर्गंधी येत आहे. सोसायटीच्या आवारामध्ये भाडोत्री गाळेधारकांनी विक्रीसाठी वाहने उभी केली असल्याने तेथील रहिवाशांना येण्या-जाण्यासाठी खूप त्रास होत आहे. भाडोत्री गाळेधारक दादागिरी करत आहेत. त्यामुळे रहिवाशांना जगणे मुश्कील झाले आहे. पालिकेने जर कारवाई केली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्त्या पूजा कांबळे यांनी दिला आहे.



सामना पान क्र.7

# मृतदेह सापडला

**वसई :** नवयुगनगरमधील आशीर्वाद अपार्टमेंटमधील एका खोलीत कुजलेल्या अवस्थेत महिलेचा मृतदेह सापडल्याने परिसरात घबराट पसरली. माणिकपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. ममताज गाझी (२८) या महिलेचा बेडवर कुजलेल्या अवस्थेत मृतदेह सापडला. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पाठविला आहे. याबाबत माणिकपूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

CamScanner

पुण्यनगरी पान क्र. ४

दि. ११/०४/2023

# गुन्हेगारांना निवडणूकबंदीच्या याचिकेवर उत्तर दाखल करा

## सर्वोच्च न्यायालयाची केंद्र सरकारला चार आठवड्यांची मुदत ▮ गंभीर गुन्ह्यांची व्याख्या करण्याची खंडपीठाची सूचना



**▮ नवी दिल्ली :** गंभीर गुन्ह्यांचे आरोप असलेल्यांना निवडणूक लढवण्यापासून रोखण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर ४ आठवड्यांच्या आत उत्तर दाखल करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केंद्र सरकारला दिले आहेत. या प्रकरणात आतापर्यंत केंद्राने आपले उत्तर दाखल न केल्यावरून न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. न्यायालयाने गतवर्षी सप्टेंबर महिन्यात या प्रकरणात केंद्र सरकारसह निवडणूक आयोगाला नोटीस बजावली होती.

गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना निवडणुकीपासून रोखण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर न्यायमूर्ती के. एम. जोसेफ आणि न्या. बी. व्ही. नागरत्ना यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणी सुनावणी झाली. केंद्र सरकारने सर्वप्रथम गंभीर गुन्हे कोणते आहेत, हे ओळखणे गरजेचे आहे, असे खंडपीठ यावेळी म्हणाले.

केंद्र सरकारने आतापर्यंत या प्रकरणात आपली भूमिका मांडली नसल्याचे नमूद करत खंडपीठाने अतिरिक्त महाधिवक्ता संजय जैन यांनी उत्तर दाखल करण्यासाठी पावले उचलण्यास सांगितले, तसेच केंद्राला आपली भूमिका मांडण्यास चार आठवड्यांची मुदत दिली. केंद्राला प्रथम गंभीर गुन्ह्यांची




व्याख्या करावी लागेल, असे खंडपीठ म्हणाले. गंभीर गुन्ह्यांचे आरोप असलेल्यांना निवडणूक लढवण्यापासून रोखण्याची मागणी वकील अश्विनी उपाध्याय यांनी याचिकेद्वारे केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने गतवर्षी २८ सप्टेंबरला या प्रकरणात केंद्रीय विधी व न्याय मंत्रालय, केंद्रीय गृह मंत्रालय आणि मुख्य निवडणूक आयोगाला नोटीस बजावली होती. याचिकेद्वारे गंभीर गुन्ह्यात खटल्याचा सामना करणाऱ्या उमेदवारांनादेखील निवडणुकीपासून रोखण्यासाठी सरकार व निवडणूक आयोगाला निर्देश देण्याची मागणी करण्यात आली होती. विधी आयोगाच्या शिफारस आणि न्यायालयाचे पूर्वीचे निर्देश असतानादेखील सरकार व निवडणूक आयोगाने याबाबत कुठलीही पावले उचलली नसल्याचा दावा याचिकेद्वारे करण्यात आला होता. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत विजयी झालेल्या ५३९ उमेदवारांपैकी जवळपास २३३ जणांविरोधात गुन्हेगारी प्रकरणे असल्याचा उल्लेख याचिकेतून करण्यात आला होता.

म.टा.पु. पान क्र. १

# गटबाजी संपवण्यासाठी भाजपचे प्रयत्न

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदर भाजपमधील अंतर्गत गटबाजी संपुष्टात आणण्यासाठी भाजपचे नेते विनय सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली. या बैठकीला आमदार गीता जैन, जिल्हाध्यक्ष रवी व्यास व माजी आमदार नरेंद्र मेहता हे स्थानिक नेते उपस्थित होते. याआधी, भाजपच्या अन्य बड्या नेत्यांनी गटबाजी संपुष्टात आणण्यासाठी केलेले प्रयत्न फोल ठरले होते. त्यामुळे नव्या घडामोडींकडे लागले आहे.

मिरा-भाईंदर भाजपच्या जिल्हाध्यक्षपदी दोन वर्षांपूर्वी तत्कालीन नगरसेवक रवी व्यास यांची नियुक्ती झाली होती. मात्र भाजपचे माजी आमदार नरेंद्र मेहता समर्थक नगरसेवकांनी

**सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक**

त्यास विरोध केल्याने, व्यास विरुद्ध मेहता अशी पक्षांतर्गत गटबाजी विविध कार्यक्रमांतून दिसली होती. यामुळे माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम होता.

वर्षभरापूर्वी शहरातील एका कार्यक्रमाला आताचे उपमुख्यमंत्री व तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस येणार असल्याने, पक्षाचे नेते रवींद्र चव्हाण यांनी ही गटबाजी संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न केले होते. एक संयुक्त बैठक घेतल्यानंतर, गटबाजी संपल्याची घोषणाही केली होती. मात्र नंतरही दोन्ही गटातील वाद कायम आहे. तत्पूर्वी प्रवीण दरेकर व इतर नेत्यांनीही गटबाजी मिटवण्यासाठी प्रयत्न केले होते.

आता पुन्हा भाजप नेते विनय सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली भाईंदरच्या मॅक्सस मॉलजवळील जिल्हा कार्यालयात शनिवारी झालेल्या बैठकीत लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षांतर्गत गटबाजी संपुष्टात आणण्याच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. यावेळी सर्व गटांनी एकत्र काम करण्यास सहमती दिल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. बैठकीला आमदार गीता जैन, जिल्हाध्यक्ष रवी व्यास, माजी आमदार नरेंद्र मेहता, माजी नगरसेवक रोहिदास पाटील, अनिल भोसले, भाजपचे पदाधिकारी हेमंत म्हात्रे आदी उपस्थित होते.

लोकमत पान क्र. ३

# बेकायदा सिलिंडर वापर, विक्रेत्यांवर गुन्हे दाखल

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** रस्ते व पदपथावर सार्वजनिक ठिकाणी लोकांची सुरक्षितता धाब्यावर बसवून गॅस सिलिंडर वापरून खाण्याच्या हातगाड्या लावणाऱ्या दोघांवर मीरा रोड पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. रविवारी, ९ एप्रिलला रात्री मीरा रोड पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक मिलिंद बोरसे, हवालदार राकेश मोरे व अमितकुमार जाधव गस्त घालत होते. त्यावेळी रामदेव पार्कच्या स्प्रिंग रोझ इमारतीबाहेरील पदपथावर गॅस सिलिंडरचा वापर करून चायनीज खाद्य पदार्थ बनवून विकत होता.



त्याच्याकडे त्याचा परवाना नसल्याने पोलिसांनी रमेश जगदीशप्रसाद कुमार (२८) याच्यावर गुन्हा दाखल करून गॅस सिलिंडर जप्त केला. दुसऱ्या गुन्ह्यात रामदेव पार्कच्या गौसिया मदरसाजवळ किस्मतली इस्माईल राइली (२८) हा हातगाडीवर सिलिंडर वापरून खाद्य पदार्थ बनवत होता. नागरिकांच्या सुरक्षिततेची कोणतीच काळजी न घेता विनापरवाना व्यवसाय केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून पोलिसांनी सिलिंडर जप्त केला.

CamScanner

पुण्यनगरी पान क्र.१

दि.११/०४/२०२३

# राष्ट्रवादी आता प्रादेशिक पक्ष

## तृणमूल, भाकपचाही राष्ट्रीय दर्जा हिरावला । आम आदमी पक्षाला राष्ट्रीय दर्जा

। नवी दिल्ली : देशाची राजधानी दिल्ली आणि पंजाबमध्ये सत्ता मिळवण्याबरोबरच गोवा, गुजरातसह अन्य राज्यांत लक्षणीय कामगिरी करणाऱ्या आम आदमी पार्टी अर्थात 'आप'ला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला. तर त्याचवेळी निवडणुकीतील कामगिरीच्या आधारे राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप) आणि तृणमूल काँग्रेसचा राष्ट्रीय पक्षाचा दर्जा निवडणूक आयोगाने सोमवारी काढून घेतला. त्यामुळे देशातील राष्ट्रीय पक्षांची संख्या आता आठवरून सहावर आली आहे.



निवडणूक आयोगाने दिल्ली, गोवा, पंजाब आणि गुजरात निवडणुकीतील कामगिरीच्या आधारावर आम आदमी पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा बहाल केला. तर त्याचवेळी राष्ट्रवादी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि भाकप या पक्षांचा राष्ट्रीय दर्जा काढून घेतला. त्यामुळे देशात आता भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), बहुजन समाज पार्टी, राष्ट्रीय पीपल्स पार्टी आणि आम आदमी पक्ष असे एकूण सहाच राष्ट्रीय पक्ष राहिले आहेत. तर नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीतील कामगिरीच्या आधारावर राष्ट्रवादी काँग्रेस व तृणमूल काँग्रेसला अनुक्रमे नागालँड आणि मेघालयात प्रादेशिक पक्षाचा दर्जा देण्यात आला आहे. तसेच नागालँडमध्ये लोक जनशक्ती पार्टी (रामविलास), मेघालयात व्हॉईस ऑफ पीपल पार्टी आणि त्रिपुरातील टिपरा मोथा पक्षाला प्रादेशिक पक्षाचा दर्जा देण्यात आला आहे. तर आयोगाने उत्तर प्रदेशातील राष्ट्रीय लोक दल (आरएलडी), आंध्र प्रदेशातील भारत राष्ट्र समिती (बीआरएस), ▶▶ पान ९ वर...

### असा मिळतो राष्ट्रीय पक्षाचा दर्जा

१. तीन भिन्न राज्यांतून लोकसभेच्या दोन टक्के जागा निवडून येणे आवश्यक

२. लोकसभा किंवा विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षास कोणत्याही चार किंवा त्याहून अधिक राज्यांतून ६ टक्के मते मिळवणे व चार जागा निवडून येणे आवश्यक

३. चार राज्यांत पक्षास राज्य पक्ष म्हणून मान्यता मिळणे गरजेचे

या तीनपैकी कोणतीही एक अट पूर्ण करणाऱ्या पक्षास केंद्रीय निवडणूक आयोगाकडून राष्ट्रीय पक्षाचा दर्जा दिला जातो.

## राष्ट्रवादी आता प्रादेशिक पक्ष

(पान १ वरून) मणिपूरमधील पीडीए, पुड्डुचेरीमधील पीएमके, पश्चिम बंगालमधील आरएसपी आणि मिझोरममधील एमपीसीएला दिलेला प्रादेशिक पक्षाचा दर्जा काढून घेतला आहे. २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीतील कामगिरीच्या आधारावर निवडणूक आयोगाने तृणमूल काँग्रेस, भाकप आणि राष्ट्रवादी काँग्रेसला नोटीस पाठवली होती. राष्ट्रीय पक्षाचा दर्जा का काढून घेतला जाऊ नये, असा प्रश्न विचारत आयोगाने या तिन्ही पक्षांचे उत्तर ऐकून घेतले होते. उल्लेखनीय बाब म्हणजे निवडणूक चिन्ह (आरक्षण आणि वाटप) आदेश १९६८ नुसार राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळवण्यासाठी राजकीय पक्षाला चार राज्यांत प्रादेशिक पक्षाचा दर्जा असणे आवश्यक आहे. संबंधित चार राज्यांतील विधानसभेत पक्षाचे किमान दोन सदस्य असले पाहिजे. प्रादेशिक पक्षाचा दर्जा मिळवण्यासाठी कोणत्याही राजकीय पक्षाला विधानसभेच्या दोन जागा जिंकाव्या लागतात आणि राज्यात किमान सहा टक्के जागा मिळवणे अपेक्षित असते.

लोकमत पु.पान क्र.१

# हॉर्न वाजविल्यावरून रहिवाशांमध्ये हाणामारी

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : इमारतीच्या प्रवेशद्वारावर रहिवासी मित्रांना घेऊन उभे असताना गाडी घेऊन आलेल्या दुसऱ्या रहिवाशाने त्यांना बाजूला होण्यासाठी हॉर्न वाजविला. त्यावरून दोन रहिवासी व त्यांच्या सोबतच्या लोकांमध्ये हाणामारी झाल्याची घटना रविवारी (दि. ९) घडली. दोन्ही बाजूंच्या फिर्यादींवरून पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

मीरा रोडच्या कनकिया भागातील रौनक हॉटेलजवळ सालासरवुड आंगण ही इमारत आहे. रविवारी, दि. ९ एप्रिलच्या रात्री १०:३० च्या सुमारास इमारतीत राहणारे जुड रिचर्ड पिंटो (वय ३२) हे त्यांचे मित्र राज गुप्ता, रमेश सुतार व विवेक पटेल हे इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारावर उभे होते. त्यावेळी इमारतीत राहणारे सम्राट पोपटराव शार्दुल (३०) हे कामावरून त्यांची गाडी घेऊन आले. प्रवेशद्वारावर जुड हे मित्रांसह उभे असल्याने त्यांना बाजूला होण्यासाठी शार्दुल यांनी हॉर्न वाजविले. जुड व मित्र बाजूला झाल्यानंतर शार्दुल यांनी गाडी आत नेली व उभी केली.

मात्र जुड यांच्या फिर्यादीनुसार सम्राट यांनी आम्ही बाजूला होऊनसुद्धा हॉर्न वाजवीत असल्याने त्यांना हॉर्न का वाजवता? अशी विचारणा केली. सम्राट हे गाडी आत उभी करून प्रवेशद्वारावर आले आणि जुड यांना शिवीगाळ, धक्काबुक्की करू लागले. तसेच ठोशा-बुक्क्यांनी व कारच्या चावीने मारहाण केली. त्यांच्यापाठोपाठ आणखी दोघेजण आले व त्यांनीसुद्धा मारले. रमेश, राज व विवेक यांना शिवीगाळ केली. मात्र, त्या तिघांनी जुड यांना सोडविले. पोलिसांनी जुड यांच्या फिर्यादीनुसार सम्राट शार्दुल व अन्य दोन अनोळखी लोकांवर गुन्हा दाखल केला आहे.



तर सम्राट यांच्या फिर्यादीवरून जुड, राज व विवेकवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सम्राट यांनी हॉर्न वाजवून बाजूला होण्यास सांगितले असता जुड आदींनी त्यांना खुन्नस देत बाजूला झाले. गाडी आत नेताना कोणीतरी शिवी दिली. शिवी दिल्याचा जाब विचारला असता जुड, विवेक व राज यांनी सम्राट यांना ठोशा-बुक्क्यांनी मारहाण केली.

CamScanner

# मीरा रोड में 20 लाख का गुटखा जब्त

निसं, मीरा-भाईंदरः नया नगर पुलिस ने 20 लाख रुपये मूल्य का प्रतिबंधित गुटखे की खेप के साथ दो लोगों को गिरफ्तार किया है। अदालत ने आरोपियों को पुलिस कस्टडी में भेज दिया। पीआईए सय्यद जिलानी ने कहा कि नाकाबंदी के दौरान दो गाड़ियों की तलाशी ली गई। एक गाड़ी से 6 लाख रुपये और दूसरी गाड़ी से 14 लाख रुपये का गुटखा बरामद हुआ। हाल में सोशल मीडिया पर गुटखा माफिया और पुलिस के बीच 'गठजोड़' का एक विडियो वायरल हुआ था।

• अमित तिवारी

CamScanner

समय भास्कर




# निरंकारी भक्तों ने भाईंदर मे किया रक्तदान

## आयुक्त दिलीप ढोले रहे उपस्थित

**पंकज दुबे/मीरा-भाईंदर**

संत निरंकारी मिशन की सामाजिक शाखा संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशन के तत्वावधान में संत निरंकारी सत्संग भवन, भाईंदर में रविवार 9 अप्रैल को को आयोजित रक्तदान शिविर में 205 निरंकारी श्रद्धालुओं ने बड़े उत्साह से रक्तदान किया। संत निरंकारी रक्त पेढ़ी, विले पार्ले, मुंबई द्वारा रक्त संकलन किया गया। निरंकारी सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज की निष्काम भाव से मानव सेवा करते रहने की दिव्य सिखलाई को अपनाते हुए भाइंदर एवं मीरा रोड से निरंकारी भक्तों ने बढ़ चढ़कर हिस्सा लिया। इस शिविर का उद्घाटन मिरा भाइंदर महानगर पालिका के आयुक्त दिलीप ढोले द्वारा किया गया। इस अवसर पर आयुक्त ने निरंकारी मिशन की मानवता की सिखलाई एवं निष्काम मानव सेवा की भूरि भूरि प्रशंसा की। शिविर के दौरान कई व्यक्तियों ने शिष्टाचार भेंट किया उनमें मुख्यतः बीजेपी के मीरा भाइंदर जिलाध्यक्ष श्री व्यास एवं स्थानीय नगर सेवक प्रवीण पाटील का समावेश था। मंडल के स्थानीय सेक्टर संयोजक श्री हिम्मतभाई के मार्गदर्शन में स्थानीय सेवादल यूनिट के सहयोग से इस शिविर का सफल आयोजन किया गया।

CS CamScanner

लोकमत

# परदेशी नागरिकांना फसवण्याचे रॅकेट

## बोगस कॉल सेंटरवर छापा; परराज्यातील ५० तरुणांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : राजोडीच्या समुद्रकिनारी असलेल्या एका फार्म हाऊसमध्ये थाटलेल्या बोगस कॉल सेंटरवर अर्नाळा पोलिसांनी रविवारी पहाटे छापा टाकून कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी कॉल सेंटर चालविणाऱ्या, त्यांना मदत करणाऱ्या व जागा मालक अशा ५३ जणांवर गुन्हा दाखल करून १३ तरुणी व ३७ तरुणांना अटक केली आहे. हे सर्व दिल्ली, पंजाब, हरयाणा राज्यातील असून उच्च शिक्षित आहेत. अर्नाळा पोलिस पुढील गुन्ह्याचा तपास करत आहेत.

ऑस्ट्रेलियातील पे पाल बँकेच्या खातेदारांचे पैसे इंटरनेट कॉलच्या माध्यमातून लुटण्याचे काम या बोगस कॉल सेंटरमधून केले जात होते. हे कॉल सेंटर मागील दीड महिन्यापासून सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. वसईच्या समुद्र किनाऱ्यावर अनेक रिसॉर्ट आहेत. अशातच राजोडी येथील एका रिसॉर्टमध्ये एक बोगस कॉल सेंटर सुरू असल्याची माहिती अर्नाळा पोलिसांना मिळाली होती. शनिवारी मध्यरात्री पोलिसांनी रिसॉर्टवर छापा मारला. यावेळी बोगस कॉल सेंटर सुरू असल्याचे आढळले.



### दिवसभर कारवाई

रविवारी दिवसभर ही कारवाई सुरू होती. ऑस्ट्रेलियाच्या पे पाल या बँकेच्या ग्राहकांचे पैसे परस्पर वळवून त्यांची आर्थिक फसवणूक केली जात होती. अटक केलेल्या आरोपींकडून २० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती अर्नाळा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कल्याणराव कर्पे यांनी 'लोकमत'ला दिली आहे.




CamScanner

# गुप्त सूचना के आधार पर ताबड़तोड़ बोगस कॉल सेंटर पर कार्रवाई, धर दबोचे गए 49 आरोपी

अजहर शेख : संवाददाता

वसई : एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत अर्नाला पुलिस ने बोगस कॉल सेंटर पर एक बड़ी कार्रवाई की है, जिसमे 16 लाख से अधिक का



माल व 49 आरोपियों को दबोचा है। यह जानकारी पुलिस ने सोमवार को दी है। पुलिस ने बताया, गुप्त संवाददाता के माध्यम से 9 अप्रैल की सूचना प्राप्त होने पर, अर्नाला पुलिस स्टेशन परिसर, ओएसी पेंट बॉल अरेना, फार्म हाउस राजोडी बिच रिसॉर्ट के पास विरार पश्चिम स्थित अवैध रूप से बिना लाइसेंस वाले कॉल सेंटरों का संचालन करना और उक्त कॉल सेंटरों में पीएवाईपीएएल का उपयोग करके ऑस्ट्रेलियाई और अन्य देशों में नागरिकों का विश्वास प्राप्त करना, यह पुष्टि हुई कि वे उनकी गोपनीय जानकारी प्राप्त कर रहे थे और इसके माध्यम से धोखाधड़ी कर रहे थे।तब सीनियर थाने के प्रभारी अधिकारी/कल्याणराव करपे और पुलिस निरीक्षक अपराध अमरसिंह पाटिल ने इस खबर की पुष्टि की, उसके बाद परिमंडल 3 डीसीपी सुहास बावचे व एसीपी चंद्रकांत जाधव को सूचना दी।जैसा कि वरिष्ठों ने उक्त स्थान पर कार्रवाई करने का आदेश दिया था, जिसके बाद वपोनि/ कर्पे ने कार्रवाई करने के लिए पोनि/अमरसिंह पाटील सपोनि/परदेशी, सपोनि/अर्जुन पवार, सफौ/मते, पोहवा/डामरे, पोहवा/विलास पवार, पोहवा/राजेंद्र पवार, पोहवा/मोराले, पोअं/मंझा, पोअं/राहुल कदम, पोअं/आळंगे, मपोअं/शिलकंदे ऐसी टीम बनाकर उक्त स्थान पर 9 अप्रैल को रात्रि 4 बजे कार्रवाई की गई। फिर उक्त कॉल सेंटर में 37 पुरुष और 10 महिलाएं मिलीं, उसके बारे में पूछताछ की गई तो उक्त शख्स बिना लाइसेंस के कॉल सेंटर में अवैध रूप से प्रवेश कर रहा है, PayPal Australia Pty Limited के ऑस्ट्रेलिया स्थित बैंकिंग ग्राहकों से उक्त कॉल सेंटर से इंनबाऊन्ड कॉल के माध्यम से इंनबाऊन्ड कॉल स्वीकार करके, PayPal का कॉल सेंटर होने का नाटक करना और विदेशी ऑस्ट्रेलियाई और अन्य PayPal ग्राहकों की गोपनीय जानकारी चोरी करने के लिए एक फर्जी कॉल सेंटर स्थापित करना। यह पता चला है कि वे अपने साथियों की आपूर्ति कर रहे हैं। उक्त स्थल से कुल 16,19,000/- रुपये मूल्य के कम्प्यूटर एवं अन्य सामग्री जब्त की गई है। आरोपी के खिलाफ सहायक पुलिस निरीक्षक अर्जुन पवार को शिकायत पर अर्नाला थाने में कलम 419,420,120 (ब),34 व अन्य धाराओं के तहत केस दर्ज किया गया है। उक्त अपराध में कुल 49 आरोपियों को गिरफ्तार किया गया है।

CS CamScanner